नि.फौ.प्र.क्र./३४/२०१८
सरकार –वि– महादेव
नि.क्र.१७

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०३
मी शपथेवर खरे सांगतो की,
नावः – मदनपाल संपत मेश्राम, वय–५५ वर्ष,
कामधंदा –पोलीस पाटील, रा.बोंडे, तह. साकोली, जि.भंडारा.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास अधिवक्ता श्री. एन. के. गणवीर यांच्यामार्फत सुरु–**

पोलीसांनी मला पंचनाम्याच्या कार्यवाही करीता बोंडे चुलबंद नदीच्या रोडवरील नाल्याजवळ घडली. तिथे पोलीसांनी पाहणी केली. माझ्यासोबत वनमाला सिंदीमेश्राम सुध्दा होत्या. पद्मा बावनथरे हीने घटनास्थळ दाखविले. तिथे लिखापढी केली होती. सुचनापत्र आणि घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही असून मजकुर बरोबर आहे. ते अनुक्रमे नि.क्र.१२ आणि १३ वर आहेत. आता मला दोन छायाचित्रे दाखविली. त्यामध्ये मी हजर आहे. त्यांना आर्टीकल–अ आणि ब देण्यात येतो.

सरतपास समाप्त.

**उलटतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. के.डी. कापगते यांच्यामार्फतः–**

मी पोलीस पाटील आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला गावात घटना घडली तर पोलीस बोलावितात. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्यांवर सही करत असतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी अगोदर कागदपत्रे तयार केली. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामे वाचुन पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा तयार केल्याचे मी खोटे सांगत आहे. घटनास्थळ पंचनामा दिनांक ११/०६/२०१८ रोजी तयार करण्यात आला. तो पंचनामा सकाळी १०.०० ते ११.०० वाजताच्या दरम्यान करण्यात आला. तो पंचनामा लिहायला किती वेळ लागला ते मला माहित नाही. पोलीसांनी माझ्या किती सहया घेतल्या ते माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, छायाचित्रे घटनास्थळावरील नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपीसोबत चांगले संबंध नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या

सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास समाप्त.

**फेरतपास काही नाही.**

माझ्या समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत.

**(नि.प्र.तळणीकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली

**१९.०३.२०२४.**